# About Us / वनवृत्ताविषयी सविस्तर माहिती

**सन 1983** पूर्वी मुळ चांदा जिल्हयांतील वनांचे कामकाज चंद्रपूर वनवृत्ताकडूनच केल्या जात होते. जिल्ह्याचे पुर्नरचनेमुळे **26 ऑगस्ट, 1982** पासून **चंद्रपूर व गडचिरोली** जिल्हा निर्मितीनंतर चंद्रपूर वनवृत्ताचे विभाजन होऊन **दि.1 सप्टेंबर 1983** पासून दक्षिण चंद्रपूर व उत्तर चंद्रपूर वनवृत्त कार्यान्वीत होवून दक्षिण चंद्रपूर वनवृत्तात मध्य चांदा, आलापल्ली, सिरोंचा व भामरागड या वनविभागाचा व उत्तर चंद्रपूर वनवृत्तात चंद्रपूर, ब्रम्हपूरी, वडसा व गडचिरोली या वनविभागांचा समावेश होता.

**महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक एफडीएम-2010/प्रक्र.2/फ-2, दि. 3.3.2010 अन्वये दक्षिण चंद्रपूर व उत्तर चंद्रपूर वनवृत्ताची पून्हा पूनर्रचना होऊन पुनर्रचने नंतर गडचिरोली, वडसा, आलापल्ली, भामरागड व सिरोंचा या वनविभागांचा समावेश असलेले गडचिरोली वनवृत्त व चंद्रपूर, ब्रम्हपुरी व मध्य चांदा या वनविभागाचा समावेश असलेले चंद्रपूर वनवृत्त दि. 7 मे 2010 पासून अस्तित्वात आले आहे.**

**महाराष्ट्र शासन अधिसुचना क्र.डब्ल्यूएलपी-1009/सीआर-229/ एफ-1, दि. 5 मे, 2010 अन्वये ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प सभोवतील 1101.77 चौ.किमी.क्षेत्र बफर झोन म्हणुन अधिसुचित करण्यांत आले आहे. बफर क्षेत्रात 401.49 चौ.किमी. वनेत्तर जागेचा समावेश आहे. सदर क्षेत्रापैकी या वनवृत्तातील चंद्रपूर वनविभागातील 541.088 चौ.किमी. व ब्रम्हपुरी वनविभागातील 33.685 चौ.किमी. क्षेत्र सदर अधिसुचनेच्या अनूषंगाने शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-10-11/प्रक्र.240/फ-1, दि. 15 नोव्हेंबर, 11 मध्ये नमूद केल्यानुसार वन्यजीव व्यवस्थापनाच्या दृष्टिने दि. 21.11.2011 पासुन ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पास हस्तांतरीत करण्यांत आले आहे.**

**तद्वतच महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी-10.11/प्रक्र.240/फ-1, दि. 19 मे, 2012 अन्वये ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्रातील व्यवस्थापनाबाबत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत कोअर क्षेत्राबरोबरच संपूर्ण अधिसूचित बफर क्षेत्र याचे एकात्मिक प्रशासकिय नियंत्रण क्षेत्र संचालक, व्याघ्र प्रकल्प, ताडोबा यांच्या नियंत्रणाखाली राहील तसेच अधिसुचित बफर क्षेत्रातील चालू असलेली वानिकी कामे क्षेत्र संचालक यांच्या प्रशासकिय नियंत्रणाखाली चालू राहतील व सदर आदेश तात्काळ अंमलात येतील असा निर्णय झाला आहे.**

या वनवृत्तातील वने **" उष्ण कटीबंधीय शुष्क पर्णझडीची वने " या** प्रकारात मोडतात. वनांमध्ये प्रामुख्याने साग, बिजा, ऐन, हिरडा, हलदु, शिवण, मोहा, तेंदू व बांबू या प्रमुख प्रजाती आहेत. तसेच वाघ, बिबट, राज्य मानचिन्ह प्राणी शेकरु अस्वल, लांडगा, जंगली कुत्रा, रानमांजर, मसण्याउद इ. मांसाहारी व गवा, सांबर, चितळ, निलगाय, ससा, माकड, रानडुक्कर, सायाळ, इ. शाकाहारी प्राणी, राष्ट्रीय पक्षी मोर, हरीयाल, निळकंठ आदी असंख्य पक्षी, फुलपाखरे व सरपटणाऱ्या प्राण्यांचा अधिवास आहे. वरोरा वनक्षेत्रात अत्यंत दुर्मिळ माळढोक पक्ष्यांचे देखील अस्तीत्व आहे.

चंद्रपूर वनवृत्तमध्ये चंद्रपूर जिल्हयातील एकूण **15** तालुक्यांचा समावेश होत असून वनवृत्तातील एकूण गावांची संख्या **1745** आहे. वनक्षेत्रात गोंड व माडिया, परधान आदिवासी बांधव प्रामुख्याने आहेत. या वनवृत्ताचे बहुतांश क्षेत्र नक्षलप्रभावीत आहे.

प्रशासकीय कामकाजाचे व वनांचे व्यवस्थापनेचे दृष्टीने या वनवृत्तात चंद्रपूर, ब्रम्हपूरी, मध्य चांदा असे तीन प्रादेशिक वनविभाग आहेत. वनवृत्ताचे एकूण भौगोलीक क्षेत्र **9870.68 चौ.किमी.** असून वनक्षेत्र **4812.11 चौ.किमी.** आहे. भौगोलीक क्षेत्राचे तुलनेत वनक्षेत्राचे प्रमाण **48.75%** आहे.

- **विस्तार - उत्तर अक्षांश** : 18.4 ते 20.5 **पूर्व अक्षांश** : 78.5 ते 80.6'
- **चतु:सिमा - पूर्वेस** : गडचिरोली जिल्हा **पश्चिमेस** : यवतमाळ जिल्हा
  **उत्तरेस** : नागपूर, भंडारा, वर्धा जिल्हा **दक्षिणेस** : आंध्र प्रदेश राज्य

| तालुका | पंचायत समित्या | लोकसंख्या ( हजारात ) | | | | | जनावरें संख्या | रस्ते लांबी (कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 | 15 | महिला - 1008 | पुरूष -1063 | एससी - 296 | एसटी - 375 | एकुण - 2071.101 | 9,97,669 | 8,490 |